# Washim District Police

**Nature of Work** :- **Solving Sensational Crimes**

**Police Station** :- **Mangrulpir and Asegaon**

**Date of Good Work done** :- **11/10/2022**

**Brief of the work done :-**

पिंपरी-चिंचवड येथील दुहेरी हत्याकांडातील आरोपीस वाशिम पोलिसांकडून अटक.

लोकमत

## पिंपरी- चिंचवड दुहेरी खुनातील आरोपी जेरबंद

लोकमत न्यूज नेटवर्क

**मंगरुळपीर :** पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवड आयुक्त कार्यालयाच्या हद्दीत घडलेल्या दुहेरी खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीस मंगरुळपीर व आसेगाव पोलीस ठाण्याच्या पथकाने १० ऑक्टोबर रोजी अटक केली व पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखा पोलीस पथकाच्या स्वाधीन केले. मंगरुळपीर पोलीस स्टेशन हद्दीतील आरोपी प्रदीप दिलीप भगत (वय २०, रा. गिंभा, ता. मंगरुळपीर) याने खून केला असल्याची माहिती गुंडा पथकाचे अधिकारी हरीष माने यांनी ८ ऑक्टोबरला मंगरुळपीर पोलिसांना दिली. या माहितीवरून येथील पोलिसांनी आरोपीला अटक करण्यासाठीचा सापळ रचला. परंतु आरोपी रुई येथे असल्याची माहिती पथकाला मिळाली. पोलिसांनी आरोपीच्या नातेवाइकांना विश्वासात घेत १० ऑक्टोबर रोजी त्याला रुई येथून अटक केले व पिंपरी - चिंचवड गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाच्या स्वाधीन करण्यात आले. ही कारवाई सहायक पोलीस निरीक्षक नीलेश शेंबडे, सागर दानडे, रविकिरण खंदारे, कर्मचारी नामदेव आदिंनी केली.